# महाराष्ट्र शासन
## नगरपरिषद प्रशासन संचालनालय

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र. ०२२ २७५६०१४५<br>इ-मेल-bindunamavali.dma@gmail.com<br>Website: https://mahadma.maharashtra.gov.in | ७ वा मजला, नवी मुंबई महानगरपालिका इमारत, सी.बी.डी बेलापूर मुंबई-४००६१४. |


नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/अंतिम निवडसूची/२०२६/ 2430797 दि. 19 AUG 2026

## * प्रसिध्दीपत्रक *

विषय :- महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा

संवर्गनिहाय अंतिम निवडसूची व अतिरिक्त अंतिम निवडसूची (प्रतिक्षायादी) प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०४ मे, २०२२.
२.नगरपरिषद प्रशासन संचालनालयाची जाहिरात क्र. नपप्रसं/कक्ष-३ ब/संवर्ग पदभरती/प्र.क्र.०१/२०२३/३८३४ दि. ११ जुलै, २०२३.
३.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०२ डिसेंबर २०२५.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ ( सेवा -४ ) दि. ०२ फेब्रुवारी २०२६.
५. नगर विकास विभाग यांचे पत्र क्रमांक:एमसीओ-२०२६/प्र. क्र.१११ /नवि -१४ दि-११ ऑगस्ट २०२६.

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ करीता दि. ११ जुलै, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून प्राप्त अर्जानुसार उमेदवारांची राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि. २५ ऑक्टोबर, २०२३ ते २४ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षेत उमेदवारांना संवर्गनिहाय प्राप्त झालेले गुण नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. १५ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते.

संदर्भ क्र ५ दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोजीच्या नगर विकास विभागच्या पत्रानुसार खालील तक्त्यात नमूद संवर्गाची भाग - ३ अंतिम निवडसूची आणि भाग - ४ अतिरिक्त निवडसूची ( प्रतिक्षसूची ) या द्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग |
|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत), गट-क (श्रेणी अ, ब आणि क) |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद पाणीपुरवठा, जलनि: सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा गट- क (श्रेणी अ, ब आणि क) |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल/ लेखापरीक्षक, गट-क (श्रेणी अ, ब आणि क) |

**उमेदवारांना सूचना :-**

१. सदरच्या भाग -३ अंतिम निवडसूची आणि भाग ४ अतिरिक्त अंतिम निवडसूचीमध्ये नाव समाविष्ट केले म्हणजे त्या उमेदवारास नियुक्ती दिली असा अर्थ होत नाही.

२. अंतिम निवडसूचीतील उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची पडताळणी जसे खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक, पदवीधर अंशकालीन, दिव्यांग व अनाथ या समांतर आरक्षणांतर्गत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांच्या तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या सक्षम प्राधिकारी यांचेकडून करुन घेण्यात येईल. सदर पडताळणीअंती संबंधित उमेदवार नियुक्तीस पात्र ठरल्यासच नियुक्ती अदेश देण्यात येतील.

३. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे संवर्गनिहाय आणि श्रेणी क निहाय आवश्यक संख्येइतके दिव्यांग व अनाथ उमेदवार पात्र न ठरल्यास शासन निर्णयानुसार अराखीव प्रवर्गातील त्या संख्येइतकी पदे रिक्त ठेवण्यात आलेली आहेत.

४. उमेदवाराने सादर केलेली माहिती चुकीची / खोटी आढळल्यास अगर सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत सक्षम प्राधिकारी यांनी अवैध / बाद ठरविल्यास, तसेच वैद्यकीय तपासणी अहवालानुसार अपात्र ठरविल्यास, संबंधीत उमेदवाराला नियुक्ती दिली जाणार नाही.

५. दिव्यांग कल्याण विभागाकडील दि. १६ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या दिव्यांगांना नियुक्ती देण्यापूर्वी दिव्यांग उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची वैद्यकिय मंडळाकडून तपासणी करण्याच्या सूचना दिलेल्या असून त्यानुसार अंतिम निवडसूचीमधील सर्व दिव्यांग उमेदवारांच्या दिव्यांगत्वाची तपासणीचे वेळापत्रक स्वतंत्ररीत्या प्रसिध्द करण्यात येईल. सदर वैद्यकिय तपासणीमध्ये दिव्यांग उमेदवार अपात्र ठरल्यास अथवा किमान ४०% पेक्षा कमी दिव्यांगत्वाचे प्रमाण दिसून आल्यास सदर उमेदवाराचे अंतिम निवडसूचीतून नाव वगळण्यात येईल.

६. दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत वैद्यकीय मंडळाकडून तपासणी झाल्याशिवाय संबंधित दिव्यांग उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत.

७. लागू समांतर आरक्षणामध्ये दर्शविण्यात आलेल्या संक्षिप्त पदांचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे. I) GEN - सर्वसाधारण ii) LDS - महिला iii) Orphan - अनाथ iv) SP - खेळाडू v) EX - माजी सैनिक vi) PT - अंशकालीन उमदेवार vii) PA - प्रकल्पग्रस्त viii) EA - भूकंपग्रस्त.

८. प्रारुप निवडसूची प्रसिध्द केल्यानंतर काही उमेदवारांनी पदस्थापनेबाबत सन्माननिय लोकप्रतिनिधी यांची शिफारस पत्रे संचालनालयास सादर केली आहेत. अशा प्रकारे पदस्थापनेसाठी दडपण/दबाव आणू नये अन्यथा संबंधित उमेदवारांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९. उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणी अंती नियुक्ती देण्यासंदर्भात सर्वस्वी अधिकार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या निवड समितीकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

१०. सदर निवडसूची पुढील संदर्भ १,३ आणि ५ मध्ये नमूद कालमर्यादेनुसार वैध राहील व त्यानंतर सदरील निवडसूची आपोआप व्यपगत होईल.

**सोबत :- संवर्गनिहाय श्रेणी क निहाय भाग-३ अंतिम निवडसूची व भाग-४ अतिरिक्त अंतिम निवडसूची**

**(अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)**
**अध्यक्ष, निवड समिती व आयुक्त तथा संचालक ,**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई**

महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र. ०२२ २७५६०१४५
इ-मेल - cadreexam२०२३@gmail.com
Website: https://mahadma.maharashtra.gov.in

७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी. बेलापूर,
रेल्वे स्टेशन जवळ (पु) नवी मुंबई-४००६१४.

नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/कागदपत्र पडताळणी/२०२६/2430833 दि. 19 AUG 2026

## उमेदवारांना सूचना

विषय :- नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ च्या भाग ३ अंतिम निवडसूची आणि भाग ४ अतिरिक्त अंतिम निवडसूचीमध्ये नमूद उमेदवारांचे कागदपत्र पडताळणीबाबत.

संदर्भ :-
१. शासन निर्णय सा. प्र. वि क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०४ मे २०२२
२. शासन निर्णय सा. प्र. वि. क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०२ डिसेंबर २०२५
३. शासन निर्णय सा. प्र. वि. क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०२ फेब्रुवारी २०२६
४. शासन पत्र न. वि. वि. पत्र क्र.एम सो ओ२०२६/प्र.क्र.१११/ नवि-१४ दि. ११ ऑगस्ट २०२६

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट क- महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट क दि. ११ जुलै, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून प्राप्त अर्जानुसार उमेदवारांची राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि. २५ ऑक्टोबर, २०२३ ते २४ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षेत उमेदवारांना संवर्गनिहाय प्राप्त झालेले गुण नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. १५ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते.

दि. ११ जुलै, २०२३ रोजीच्या जाहिरातीत संवर्गनिहाय व श्रेणीनिहाय नमूद रिक्त पदांच्या संख्येनुसार सदर परीक्षेतील पात्र उमेदवारांची गुणानुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून एकूण ८ संवर्गांची भाग-१ प्रारुप निवडसूची व भाग-२ अतिरिक्त प्रारुप निवडसूची (प्रतिक्षायादी) दि. १० जून, २०२४ रोजी संचालनालयाच्या https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

संदर्भ क्रमांक ४ मध्ये नमूद शासन पत्र दि. ११ ऑगस्ट २०२६ मध्ये नमूद केल्यानुसार," सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०४ /०५/ २०२२ रोजीच्या शासन निर्णयांमध्ये नमूद तरतुदींची पूर्तता करणाऱ्या तसेच ज्या समांतर आरक्षण संवर्गात उमेदवार उपलब्ध असतील त्या त्या प्रवर्गाच्या उमेदवारांची निवड सूची या विभागाच्या (सामान्य प्रशासन विभागाच्या) दिनांक २ डिसेंबर २०२५ व २ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेत लावता येईल."

वरील निदेशानुसार संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या भाग तीन अंतिम निवड सूची आणि भाग चार अतिरिक्त अंतिम निवड सूचीतील उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज जसे शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाबाबत पुरावा, अधिवास प्रमाणपत्र व इतर सर्व दस्ताऐवज यांची मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह तसेच कागदपत्र पडताळणीकरीता सोबत जोडलेले "कागदपत्र तपासणी प्रपत्र" उमेदवारांनी भरुन प्रत्येक पानावर स्वाक्षरी करुन स्वत: कागदपत्र पडताळणीकरीता ७ वा मजला, बेलापूर भवन,सी.बी.डी.बेलापूर,रेल्वे स्टेशन जवळ (पू) नवी मुंबई -४०० ६१४ येथे खालील नमूद वेळी समक्ष उपस्थित रहावे. उमेदवारांच्या वतीने त्यांच्या प्रतिनिधींना कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहता येणार नाही, राहिल्यास त्यांची कागदपत्र पडताळणी करण्यात येणार नाही.

| अ.क्र | पदाचे नाव | दस्ताऐवज पडताळणी दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा - विद्युत, गट-क (श्रेणी क) | २१ ऑगस्ट २०२६ सकाळी ११.०० वाजता |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद पाणीपुरवठा, जलनि: सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा गट- क (श्रेणी क) | २१ ऑगस्ट २०२६ सकाळी ०१.०० वाजता |
| ४ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल/ लेखापरीक्षक, गट-क (श्रेणी क) | २१ ऑगस्ट २०२६ सकाळी ०३.०० वाजता |

उमेदवारांनी आपणास नेमून दिलेल्या तारखेस व वेळेत उपस्थित रहावे.

दस्ताऐवज पडताळणीचे वेळी उमेदवाराने स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा, स्वत:चे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने आरक्षित जागेकरीता अर्ज केला असल्यास त्या पुष्टयर्थ आवश्यक असलेली मूळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत सादर केलेली माहिती व अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रांच्या अनुषंगाने उमेदवाराने सोबत आणावयाची मूळ कागदपत्रे खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १. | एस.एस.सी प्रमाणपत्र |
| २. | पदास आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करीत असलेबाबत तसेच आवश्यक अर्हतेपेक्षा जास्त शैक्षणिक अर्हता असल्यास त्याबाबत गुणपत्रिका व प्रमाणपत्रे. |
| ३. | वयाचे पुराव्याबाबत सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेला जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, |
| ४. | उमेदवार मागास प्रवर्गातील असल्यास संबंधित जात प्रमाणपत्र. |
| ५. | अनुसुचित जमाती प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र. |
| ६. | वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र. |
| ७. | दिव्यांग व्यक्ती प्रमाणपत्र. |
| ८. | माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र / युध्दात / सैन्यदलातील सेवेत मृत्यू पावलेल्या किंवा अपंग झाल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| ९. | क्रीडा प्रमाणपत्र व क्रीडा पडताळणी प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| १०. | अनाथ प्रमाणपत्र. |
| ११. | अंशकालीन पदवीधर /पदवीकाधारक प्रमाणपत्र. |
| १२. | भुकंपग्रस्त प्रमाणपत्र. |
| १३. | प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र. |
| १४. | उमेदवाराचे नावात बदल असल्यास विवाह नोंदणी दाखला अथवा राजपत्र इत्यादी. |
| १५. | महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबत महाराष्ट्रातील जन्म दाखला / डोमिसाईल प्रमाणपत्र. |
| १६. | ज्या पदाकरीता अनुभव आवश्यक आहे अथवा अनुभवास प्राधान्य आहे अशा पदाकरीता उमेदवाराने अनुभव नमूद केला असल्यास -<br>१. नियोक्त्याने दिलेला नियुक्ती आदेश<br>२. नियोक्त्याने दिलेले अनुभव प्रमाणपत्र<br>३. अनुभव कालावधीतील सर्व वेतन चिठ्ठी (पेमेंट स्लिप) ज्यात उमेदवाराचा आयडी क्रमांक व बँकेचे नाव नमुद असेल.<br>४. अनुभव कालावधीतील उमेदवाराचे वेतन जमा झाल्याचे नोंद असलेले बँक पासबुक अथवा बँक स्टेटमेंट. |

उमेदवार विहित शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

निवडसूची कालमर्यादा संपण्यास कालावधी कमी असल्यामुळे उपरोक्त नमूद दिवशी दस्तऐवज पडताळणीकरीता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन निवड रद्द केली जाईल व तद्नंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

संबंधित उमेदवारांनी खोटे व दिशाभूलकरणारे कागदपत्र सादर केल्याचे दिसून आल्यास किंवा विविध संवर्गाचे ऑनलाईन अर्ज सादर करताना अपलोड केलेले कागदपत्रे आणि प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणीवेळी सादर केली जाणारी कागदपत्रे यांमध्ये तफावत आढळल्यास संबंधित उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.

दस्तऐवज पडताळणीकरीता उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे असून दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचा निर्णय अंतिम राहिल व तो उमेदवारावर बंधनकारक राहील.

उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणी अंती नियुक्ती देण्यासंदर्भात सर्वस्वी अधिकार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या निवड समितीकडे राहतील.

(अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)
अध्यक्ष, निवड समिती व आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा 2023

महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत), गट-क, श्रेणी-क (वेतनश्रेणी एस - 13 : 35400 - 112400) सर्वसाधारण उमेदवारांमधून भरावयाची पदे

भाग ३ : अंतिम निवड सूची

एकूण भरावयाची पदसंख्या ७

एकूण रिक्त पदसंख्या - ०३

| अनु क्र. | बैठक क्रमांक | उमेदवाराचे नाव | लिंग | जन्म दिनांक | मूळ प्रवर्ग | एकूण प्राप्त गुण | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|

अनुसूचित जाती

भरावयाची पदसंख्या - 01 (00+01) | अंतिम निवडसूचीतील उमेदवारांची संख्या - ०१ | रिक्त पदसंख्या - ००

| अनु क्र. | बैठक क्रमांक | उमेदवाराचे नाव | लिंग | जन्म दिनांक | मूळ प्रवर्ग | एकूण प्राप्त गुण | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 20912680200006 | ARVIND SUNIL SONBARSE | Male | 2-Jan-94 | Schedule Cast (SC) | 122.00000 | SC-GEN |

अनुसूचित जमाती

भरावयाची पदसंख्या -०२ | गुणतालिकेत उपलब्ध पात्र उमेदवार ० | रिक्त पदसंख्या - ०२

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक

भरावयाची पदसंख्या - ३ | रिक्त पदसंख्या - ००

| अनु क्र. | बैठक क्रमांक | उमेदवाराचे नाव | लिंग | जन्म दिनांक | मूळ प्रवर्ग | एकूण प्राप्त गुण | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 20911670900009 | KULKARNI PRATHAMESH PRADIP | Male | 12-Jun-96 | Economically Weaker Section (EWS) | 121.00000 | EWS-GEN |
| 2 | 20911135400431 | YOGESH SHRIRANG CHOUGALE | Male | 23-Aug-92 | Economically Weaker Section (EWS) | 120.00000 | EWS-GEN |
| 3 | 20910856700032 | HIMALAYA SHESHRAO HIWARDE | Male | 7-May-93 | Economically Weaker Section (EWS) | 119.50000 | EWS-against LDS |

गुणतालिकेत उपलब्ध पात्र दिव्यांग उमेदवार - ० यास्तव अराखीव सर्वसाधारण १ पद पुढील भरती साठो राखीव

(डॉ नीलम पाटील)
सदस्य सचिव, निवड समिती तथा उपायुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

(समीर उन्हाळे)
सह आयुक्त तथा सदस्य
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

(अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)
अध्यक्ष, निवड समिती व आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३

महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत), गट-क, श्रेणी-क (वेतनश्रेणी एस - १३ : ३५४०० - ११२४००) सर्वसाधारण उमेदवार

भाग ४ : अतिरिक्त अंतिम निवडसूची (प्रतीक्षासूची)

| अनु क्र. | बैठक क्रमांक | उमेदवाराचे नाव | लिंग | जन्म दिनांक | मूळ प्रवर्ग | एकूण प्राप्त गुण | प्रतीक्षा यादीतील निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| अनुसूचित जाती | | | | | | | |
| 1 | 20913546900013 | KAPIL NARAYANRAO SALVE | Male | 16-Aug-85 | Schedule Cast (SC) | 120.00000 | WL-SC-GEN |
| 2 | 20912634700120 | SAGAR NAGNATH KALWALE | Male | 12-Jan-93 | Schedule Cast (SC) | 119.00000 | WL-SC-GEN |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | | | | | | | |
| 1 | 20910434700053 | DIGAMBAR RAJENDRA BENDUGADE | Male | 30-Mar-95 | Economically Weaker Section (EWS) | 118.50000 | WL- EWS GEN/against ( EWS-LDS ) |
| 2 | 20910858800151 | SHUBHAM BHAGAVAN KAWADE | Male | 9-Sep-95 | Economically Weaker Section (EWS) | 117.50000 | WL- EWS GEN/against ( EWS-LDS ) |
| 3 | 20912680000032 | AJINKYA SUBHASH PATIL | Male | 14-Oct-93 | Economically Weaker Section (EWS) | 115.50000 | WL- EWS GEN/against ( EWS-LDS ) |

( डॉ नीलम पाटील )
सदस्य सचिव, निवड समिती तथा उपायुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

(समीर उन्हाळे)
सह आयुक्त तथा सदस्य
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

( अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)
अध्यक्ष, निवड समिती व आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई